आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
११ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृती दलाची स्थापना करण्याचा कृषी विभागाचा निर्णय, दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूरग्रस्त तालुक्यातल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ

- प्राध्यापक भरतीसाठी सुधारित दिशानिर्देश जारी, पेसा भरतीची प्रक्रीयाही पूर्ण करण्यासाठी शासन आदेश प्रसिद्ध

- एसटीमध्ये विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी NCMC कार्ड अनिवार्य होणार

- मुंबई महानगरपालिकेत ४४ वर्षांनंतर भाजपाचा महापौर

**आणि**

- बारावीच्या परीक्षेत छत्रपती संभाजीनगर आणि बीडमध्ये कॉपी उघड

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एका कृती दलाची स्थापना करण्याचा निर्णय राज्याच्या कृषी विभागानं घेतला आहे. मानसिक आरोग्य, सामाजिक समस्या, आर्थिक आव्हानं आणि हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आपत्तींबाबत उपाययोजनांची शिफारस आणि अंमलबजावणीचं काम हे कृती दल करेल. कृषी विभागाच्या विस्तार आणि प्रशिक्षण विभागाचे संचालक रफीक नाईकवाडी या कृदी दलाचे प्रमुख असतील. तर सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंडे, नंदकिशोर नैनवाड, सत्यजीत शितोळे, सोनाली शिलकर, विनायक हेगाना आदी या कृती दलाचे सदस्य असतील. आधीच्या समितीच्या अहवालाचा अभ्यास केला जाईल आणि आवश्यक त्या उपाययोजना राबवल्या जातील असं रफीक नाईकवाडी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात गेल्या वर्षी दुष्काळग्रस्त, अतिवृष्टी आणि पूरग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या तालुक्यातल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ केल्याचा शासन निर्णय सरकारनं आज जारी केला. ही सवलत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी लागू असून सर्व विद्यापीठं, परीक्षा मंडळं आणि महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांना ही शुल्क माफी लागू असेल.

**<><><><>**

पेसा भरती पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने आज शासन आदेश जारी केला आहे. त्यानुसार ज्या गावामधे आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा अधिक किंवा २५ ते ५० टक्क्या दरम्यान आहे तिथं ५० टक्के पदं अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरावीत असा निर्णय सरकारने घेतला आहे. अशा क्षेत्रामधे ५० टक्के पदं ही खुली असतील. ज्या गावामध्ये आदिवासींची लोकसंख्या २५ टक्क्यापेक्षा कमी आहे तिथं २५ टक्के जागा अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी, २५ टक्के इतर आरक्षित प्रवर्गासाठी राखीव असतील. या आरक्षणानुसार पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरती केली जाणार आहे.

<><><><>

राज्य सरकारनं सार्वजनिक विद्यापीठांमधल्या प्राध्यापक निवड प्रक्रियेसाठीच्या नियमांमध्ये बदल केला आहे. त्यानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना शैक्षणिक पात्रता आणि संशोधनाला ६० टक्के, शिकवण्याचा अनुभवाला २० टक्के आणि मुलाखतीमधल्या कामगिरीला २० टक्के महत्त्व दिलं जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या निवड प्रक्रियेत सुद्धा हीच कार्यपद्धती वापरली जाणार आहे.

<><><><>

एस.टी. महामंडळानं 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग यासारख्या सर्वांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असेल. १९९ रुपये देऊन हे कार्ड विकत घ्यावे लागेल. बसस्थानकांवर तसंच विविध ३ हजार एजंटकडे हे कार्ड मिळणार आहे.

<><><><>

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. काल रात्री त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली होती. त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, त्यांचे सुपुत्र पार्थ आणि जय पवार हेही उपस्थित होते.

<><><><>

यंदाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी एकूण १७ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च केला जाणार आहे. ही रक्कम देशाच्या जीडीपीच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केलं. लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. १६ व्या वित्त आयोगानं राज्यांना ४१ टक्के निधी देण्याची सूचना केली आहे. येत्या आर्थिक वर्षात हा सुमारे साडे २५ लाख कोटी रुपयांचा निधी दिला जाणार असल्याचं त्या म्हणाल्या. गेल्या वित्त आयोगाच्या कालावधीत सुद्धा निर्धारित असलेला सर्व निधी राज्यांना दिला होता. वित्त आयोगाच्या अहवालात त्याचा स्पष्ट उल्लेख असल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><><>

राज्यात एक लाख ५० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिली. अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले

**होल्ड बाईट वैष्णव**

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठीही विविध उपाययोजना सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

केंद्र सरकारने राष्ट्रीय गीत वंदे मातरम संदर्भात आज नवे दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार सरकारी कार्यक्रमांमधे, शाळांमधे, तसंच इतर महत्त्वाच्या कार्याक्रमांमधे जन गण मन या राष्ट्रगीतानंतर लगेचच  वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य असेल. वंदे मातरम गीताची सर्व सहा कडवी वाजवली जातील. यापूर्वी वंदे मातरमची दोनच कडवी प्रचलित होती, आता मात्र हे गीत संपूर्ण वाजवलं जाईल, असं या दिशानिर्देशांमधे म्हटलं आहे.

<><><><>

तब्बल ४४ वर्षानंतर भारतीय जनता पक्षाचा नगरसेवक महापौरपदी विराजमान झाला. भाजपच्या नगरसेविका रितू तावडे यांनी आज मुंबईच्या ७८ व्या महापौर म्हणून कार्यभार स्वीकारला. शिवसेनेचे संजय घाडी यांना उपमहापौर पद देण्यात आलं आहे. दोघांच्या बिनविरोध निवडीची घोषणा बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच दोन्ही पक्षाचे नेते उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले...

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - - -**

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यात जैतापूर इथं इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेत इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान सामूहिक कॉपीप्रकरण उघडकीस आलं आहे. याप्रकरणी निरीक्षकांसह २३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या चौसाळा गावातल्या परीक्षा केंद्रात इयत्ता बारावीच्या इंग्रजी विषयाच्या पेपर दरम्यान परीक्षार्थींना पालकच कॉप्या पुरवत असल्याची दृश्य प्रशासनानं सुरक्षेसाठी तैनात केलेल्या ड्रोन कॅमेऱ्यांनी टिपली आहेत.  याप्रकरणी केंद्र प्रमुख आणि शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना दिले आहेत.

<><><><><>

मुंबईतल्या कोस्टल रोडवर मुंबई महापालिकेनं देशातला पहिला संगीतमय मार्ग उभारला आहे. या मार्गावरुन नरीमन पॉइंटवरुन वरळीकडे जाताना संगीत पट्टे बसविण्यात आले आहेत. या पट्ट्यांवरून ताशी ६० ते ८० किलोमीटर वेगाने वाहन नेल्यास स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातल्या ‘जय हो’ या गीताची धून वाहनात बसून ऐकू येते. हंगेरियन तंत्रज्ञानावर ही संकल्पना आधारित आहे आणि जगातला पाचवा तसंच देशातला पहिलाच प्रयोग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या मार्गाचं लोकार्पण झालं.

//<><><><><>//